दखल

**मंगेशकर घराण्याच्या गायकीचा आपल्यावर कसा प्रभाव आहे याबद्दल लेखिका मोहिनी वर्दे यांनी सप्तकमधून छान आढावा घेतलाय. सदर पुस्तकातील त्यांच्या प्रस्तावनेचा हा निवडक भाग...**

# सप्तक: सात मंगेशकरांची सरगम




सप्तक या शीर्षकात फक्त सात सुरांचा संदर्भ नाही; तर सात मंगेशकरांचा आणि आपला ऋणानुबंध अभिप्रेत आहे.

मंगेशकारांच्या संगीताने आपल्या प्रत्येकाच्या अंतःकरणाचा एक कोपरा सदैव उजळलेला आहे. गेली पन्नासहून अधिक वर्षे तीन पिढ्यांनी या कुटुंबाचे गाणे ऐकले. मीही त्यांचे गाणे ऐकत वाढले. लता, आशा आणि हृदयनाथ माझ्या सौभाग्याचा हिस्सा आहेत. कळत नकळत त्यांचे गाणे माझ्या एकांतातल्या खेळातला भिडू बनते. कधी मी खूप मागे जाते, म्हणजे आपल्या आजूबाजूच्या जीवनाची जाग येतानाच पहिला क्षण चिमटीत पकडण्याचा प्रयत्न करते तेव्हा त्या क्षणावर लताचे गाणे उमटलेले मला आढळते. बालपणापासून माझ्या भावविश्वावर प्रामुख्याने लताच्या गाण्याचे ठसे उमटले आहेत.

या लेखनात खरे तर मी माझ्या भावविश्वाचे आकार न्याहाळत गेले आहे. बासनात गुंडाळलेल्या रेशमी पैठणीला ऊन देण्याचा हा प्रकार आहे. काही रंग रंगलेले. कोठे नक्षीकाम धूसर झालेले. यात लताच्या गाण्याच्या आठवणी खूप आहेत. एखाद्या आठवणीतून माझी मीच प्रत्ययाला येते. लताचे गाणे मागे उभे असते. काही वेळेस गाणे मला बोलावते. मग हातातले काम टाकून मी गाण्यामागे धावत जाते. तर एखादे वेळेस मी ठाम उभी राहून गाण्याला खुणावते. ते त्याची जागा सोडत नाही. मीही माझी जागा सोडत नाही. मग आमच्यामध्ये एक इंद्रधनुषी पूल तयार होतो. अशी ती माझी सहचरी आहे. खरे तर लताच्या गाण्याशी काही समांतर नाही.

आशाच्या मराठी गाण्याच्या कितीतरी कधी न पुसणाऱ्या भावप्रतिमा मनावर उमटल्या आहेत. मेलडीच्या भावमधुर काळात आशाने द्वंद्वगीतांची खाण उघडली होती. त्या काळच्या आशाच्या अशा रत्नखचित गाण्यांचा मन सतत पाठलाग करीत असते. गेल्या दहा वर्षांत अशा मनबुद्धीला भिडत गेली. आशाचे गाणे अधिकाधिक तजेलदार होत गेले. अलीकडचे तिचे प्रत्येक नवे गाणे ऐकण्यासाठी मन आससते. प्रौढ वयात तिच्या गाण्याने एकप्रकारची वेगळी मोहिनी घातली. नव्या तांत्रिक सुधारणांचा ध्वनिमुद्रणात वापर केला जातो. आजचे तरुण संगीतकार भन्नाट चाली देतात आणि तांत्रिक ट्रिक्स करतात; पण तरुणांना उतारवयातली आशा पुरून उरते. ती आजचे गाणे गाते. ते परिपक्व गाणे ऐकणे हा एक वेगळाच आनंद आहे. तरीही लेखन करताना कुणासाठी किती पृष्ठसंख्या खर्ची घातली हा हिशेब इथे अर्थशून्य आहे.

परमेश्वराने दीर्घायुष्याचे दान त्यांच्या पदरात टाकले. मेहनत, चिकाटी आणि प्रयत्न या गुणांच्या बळावर लता आणि आशाने त्या दानाचे वरदान केले. या पुस्तकामागच्या लेखनाची प्रेरणा शोधू गेले तर माझ्या संवेदनशील वयात झालेल्या संस्कारांचा तो परिपाक असावा असे खरोखरच मला वाटते. माझे वडील श्री. शंकरराव देशपांडे हे मूळचे कोल्हापूरचे. ते अब्दुल करीमखाँ यांच्याकडे गाणे शिकले होते. श्रीमती केसरबाई केरकर व श्रीमती मोगुबाई कुर्डीकर यांचा व वडिलांचा चांगला स्नेह होता. श्री. वामनराव सडोलीकर वडिलांना गाणं शिकवण्यासाठी अनेक वर्षे घरी येत असत. तेव्हा मी व माझी मोठी बहीण सौ. सुहासिनी मुळगावकर अशा आम्ही दोघी वामनरावांकडे गाणे शिकत असू. आम्ही त्यांना गुरुजी म्हणत असू. संगीतज्ज्ञ श्री. वामनराव देशपांडे यांचा व आमचा घरोबा होता. स्कूल ऑफ इंडियन म्युझिकचे प्रिन्सिपॉल प्रो. देवधर म्हणजे देवधरमास्तर आणि श्री. जी. एन. जोशी हे एच.एम.व्हीं.चे अधिकारी, या मंडळींचे सतत घरी जाणे-येणे असे. माझे वडील व्यवसायाने शेअर ब्रोकर होते. पण पहाटे उठून रोज गाण्याचा रियाज करीत. ते भजने उत्तम गात असत. त्यांचा आवाज भावपूर्ण होता. बडे गुलाम अली खाँ माझ्या वडिलांकडे भजन शिकण्यासाठी आल्याचे मला पक्के स्मरते. वडील महात्मा गांधीजींच्या प्रार्थनेत गात असत. आमच्या घरात बालगंधर्वांची गाणी येता-जाता कानावर पडत. एकूण आमच्या घरात असे संगीतमय वातावरण होते.

या पुस्तकात दीनानाथ मंगेशकर, लता, मीना, आशा, उषा आणि हृदयनाथ यांच्या संगीताविषयीचे जणू माझे आत्मकथन आहे. दीनानाथांना मी प्रत्यक्ष ऐकलेले नाही किंवा पाहिलेले नाही. त्यांच्या उपलब्ध ध्वनिमुद्रिकांची कॅसेट मला हृदयनाथनी एकदा ऐकायला दिली होती. त्यावरून मी त्यांच्या गाण्याविषयी लेख प्रसिद्ध केला. पुन्हा एकदा दीनानाथांच्या पन्नासाव्या पुण्यतिथीला हृदयनाथनी मला त्यांच्यावर लिहायला सांगितले. त्यावेळी अधिक संशोधन करून मी लेख लिहिला. या दोनही लेखांचा उपयोग करून मी या पुस्तकाकरिता पुनर्लेखन केले. हा लेख विश्लेषणात्मक आहे.

दीनानाथ मंगेशकरांच्या शताब्दी वर्षामध्ये एकदा आम्ही सहज बोलत असताना लताबाईंवर लेखन करावे अशी माझी इच्छा असल्याचे ही हृदयनाथना सांगितले. ही कल्पना सर्वांना आवडली. पुढे सर्व मंगेशकरांच्या गाण्यावर लिहावे असे ठरले. त्यातून हा पुस्तकाचा प्रपंच!

माझ्या लेखनातून काही वेळेस सरगमचा उल्लेख येतो. ते नोटेशन गाण्याचे विश्लेषण करण्यासाठी नसून त्या गाण्यापासून होणाऱ्या आनंदाची इयत्ता कोणती हे तपासून पाहण्याचा तो प्रयत्न असतो.

जो आनंद मला मंगेशकरांच्या गाण्याने दिला त्याचे हे शब्दरूप रसिकांना काही प्रमाणात आनंद देवो ही वाचकांपाशी विनंती. इति. ●